# अमरावती महानगरपालिका, अमरावती
## दिनांक २.१.२०२३ रोजी प्राप्त प्रशासकीय विषय

**(प्रशासकीय विषय)**

**विषय क्रमांक ५३ :** - अमरावती महानगरपालिकेच्या मालकीची मौजा राजापेठ शिट क्र.५४ बी भुखंड क्र.८५ व ८६ येथील बाजार परवाना विभागाची (जॅक ॲण्ड जिल) इमारत मा. विभागीय उपआयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, अमरावती विभाग, अमरावती यांना भांडेतत्वावर कार्यालयाचे वापरा करीता देण्याबाबत.

**ठराव क्रमांक ५३ :-** मा.विभागीय उपआयुक्त राज्य उत्पादन शुल्क अमरावती विभाग अमरावती यांनी पत्र क्र.इएसटी ११२०२२/इमारत/भाडे/विउआ, अम.दिनांक २४/६/२०२२ अन्वये अमरावती महानगरपालिकेच्या मालकीची राजापेठ येथील बाजार परवाना विभागाची (जॅक ॲण्ड जिल) इमारत कार्यालयाचे वापरा करीता मागणी केलेली आहे.

राज्य उत्पादन शुल्क, अमरावती विभाग अमरावती या कार्यालयाचे शासकीय इमारतीचे बांधकाम सुरु असल्याने २-३ वर्ष किंवा इमारतीचे बांधकाम पुर्ण हावुन ताबा मिळेपर्यत जे आधी होईल त्या कालावधी पर्यत विषंयाकीत इमारत भाडे तत्वावर मागणी केलेली आहे.

मौजा राजापेठ शिट क्र. ५४ बी भुखंड क्र. ८५ व ८६ या जागेवर विषयांकीत महानगरपालिका मालकीची उक्त इमारत स्थित आहे. या जागेचे एकुण क्षेत्र .६९६.३७ चौ.मी. असुन तळमजल्याने बांधकाम क्षेत्र. १९१.२८ चौ.मी. व पहिल्या मजल्याचे बांधकाम क्षेत्र. १७३.१० चौ.मी आहे.सदर इमारतीचे बांधकामा अंदाचे सन १९९६ मध्ये करण्यात आलेले आहे.

सार्वजनिक बांधकाम विभाग यांना पत्र क्रअमनपा/ससंनर/१४६४/२०२२ दिनांक २५/११/२०२२ अन्वये उक्त इमारतीचे भाडे निश्चित करुन देण्या बाबत कळविण्यात आले होते .त्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती यांनी पत्र क्र.१०२९६/चिशा/आरे/भाडे दिनांक २१/१२/२०२२ अन्वये उक्त इमारतीचे दरमहा भाडे रुपये ५०२२९/- (अक्षरी -पन्नास हजार दोनशे एकोणतीस रुपये फक्त) निश्चित करुन दिले आहे.

सदर्हु इमारत भाडे तत्वावर देण्याकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधि.१९४९ चे कलम ७९ अंतर्गत सर्वसाधारण सभेची मान्यता आवश्यक आहे.अमरावती महानगरपालिकेच्या मालकीची मौजा राजापेठ शिट क्र. ५४ बी भुखंड कं. ८५ व ८६ येथील बाजार परवाना विभागाची (जॅक ॲण्ड जिल) इमारत राज्य उत्पादन शुल्क, अमरावती विभाग, अमरावती यांना कार्यालयाचे वापरा मासिक भाडे रु. ५०,२५०/- प्रती महा प्रमाणे पुढील तिन वर्षा करीता देण्याचे प्रस्तावित आहे. उक्त प्रस्तावास मा.आयुक्त यांनी दिनांक २/१/२०२३ रोजीला मंजुरी दिलेली आहे.

उपरोक्त प्रशासकीय विषय सर्वसाधारण सभेच्या मंजुरी करीता सादर करण्यात आला आहे. परंतु, सद्यस्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने सदर प्रशासकीय विषयास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव मंजुर व कायम

| | |
|---|---|
| **स्वा/-** | **स्वा/-** |
| **नगरसचिव,** | **प्रशासक,** |
| **महानगरपालिका,अमरावती** | **महानगरपालिका,अमरावती** |

नगरसचिव
महानगरपालिका, अमरावती.